Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्राच्या विधानसभेत महिला भुमिका व सहभाग यांचा आढावा

**ज्ञानेश्वर शिवनारायण ढाकणे**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांना दुय्यम स्थान मिळाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचे प्रतिनिधीत्व कमी दिसून येते कारण महाराष्ट्रात महिला ह्या पुरूष सत्ताक पध्दतीमुळे त्यांच्या हातात ही सत्ता कमी प्रमाणात दिलेली दिसते. महाराष्ट्राच्या इतिहासात आत्तापर्यंत महिला मुख्यमंत्री झालेली नाही. याचे मुख्य कारण समजवून घेणे हे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे वाटते. महाराष्ट्राच्या स्थापनेपासुन ते आत्तापर्यंत मंत्रिमंडळ विस्तारात आपल्याला महिलांच्या हातात कमी दर्जाची खाती दिलेली दिसून येते. गृहमंत्री कृषीमंत्री सरकार मंत्री, उद्योगमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा नगरविकास अशा खात्यांवर महिला मंत्री झालेल्या नाहीत. त्यांना फक्त महिला विकास, बालकल्याण, समाजकल्याण किंवा राज्यमंत्री पदे देण्यात आलेली दिसून येते. विधानसभेत महिला सदस्य होण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे महिलांना दुय्यम प्रकारची खाती देण्यात आलेली दिसून येते. यामुळे महाराष्ट्राच्या विधानसभेत महिलांचे कसे प्रतिनिधी जास्त निवडून येतील याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**उद्दिष्ट्ये :**

१. महिलांचा राजकीय सहभाग अभ्यासणे.
२. लोकप्रतिनिधी संख्येतील स्त्री-पुरूष फरक अभ्यासणे.

**महाराष्ट्राच्या विधानसभेतील महिलांचा सहभाग :**

महाराष्ट्राच्या विधानसभेतील महिलांचा सहभाग पुढीलप्रमाणे तक्त्यातून समजावून घेता येईल.

तक्ता क्र.१ - निवडणूकनिहाय महाराष्ट्र विधानसभेतील लोकप्रतिनिधी संख्या

| अ.क्र. | निवडणूक वर्ष | एकूण सदस्य संख्या | पुरूष आमदार | महिला आमदार |
|---|---|---|---|---|
| 1 | 1962 | 264 | 251 | 13 |
| 2 | 1967 | 270 | 261 | 09 |
| 3 | 1972 | 270 | 247 | 23 |
| 4 | 1978 | 288 | 280 | 08 |
| 5 | 1980 | 288 | 269 | 19 |
| 6 | 1985 | 288 | 272 | 16 |
| 7 | 1990 | 288 | 282 | 06 |
| 8 | 1995 | 288 | 277 | 11 |
| 9 | 1999 | 288 | 276 | 12 |
| 10 | 2004 | 288 | 276 | 12 |
| 11 | 2009 | 288 | 277 | 11 |
| 12 | 2014 | 288 | 268 | 20 |
| 13 | 2019 | 288 | 264 | 24 |
| 14 | 2024 | 288 | 267 | 21 |
| एकूण | | | 3767 | 205 |

वरील तक्त्यावरून असले लक्षात येते की, १९६२ ते २०२४ पर्यंत झालेल्या सर्वच विधानसभा निवडणुकीत महिलांचे निवडून येण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. आज मात्र स्त्री-पुरूष समानतेच्या कितीही पुरस्कार करीत असलो तरी वास्तवात मात्र वेगळे आहे. संबंधीत कालावधीत महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये निवडून आलेले पुरूष आमदारांची संख्या ३७६७ इतकी आहे तर निवडून आलेल्या महिलांची संख्या फक्त २०५ आहे. या आकडेवारीच्या आधारे से म्हणता येईल की अजुनही स्त्री-पुरूष राजकीय समानतासा शासन स्तरावर योग्य भुमिका घेतलेली दिसून येत नाही पण आत्ता मात्र महिला आरक्षण विधेयक पारित करून महिलांना संसदेत व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यामुळे ३३ टक्के महिला प्रतिनिधी विधानसभेत आपल्याला पाहवयास मिळतील. १०६ घटनादुरूस्ती करून भारतीय संविधान कलम ३३० लोकसभा व कलम ३३२ विधानसभेत बदल करून अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षण ही ३३ टक्के महिला आरक्षण देण्यात आले आहे.

भारतीय राज्यघटनेने लिंगभाव प्रमाण तत्त अंतर्भूत करून महिलांना संधी उपलब्ध करून देण्यासाी तरतुदी केलेल्या आहेत. कलम १४, कलम १५ (१), कलम १६, कलम ३९ (अ), कलम ३९ (ड), कलम ४२, ५१ (१), कलम २४३, कलम २४३ (ड) कलम ३३०, कलम ३३२ ही भारतीय राज्यघटनेची कलमे महत्त्वाची ठरतात.

महाराष्ट्र शासनाने स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्यासाळी वेळोवेळी उपाययोजना केलेल्या आहेत. मात्र याला सामाजिकस्तरावर फारसा प्रतिसाद मिळाल नाही तसेच म्हणावे लागेल. कारण वेळोवेळी उपाययोजना केलेल्या आहेत. मात्र याला सामाजिकस्तरावर फारसा प्रतीसाद मिळाला नाही तसेच म्हणावे लागेल, कारण वेळोवेळी वेगवेगळ्या स्तरावर महिला धोरण 'रविले जाते.

मात्र प्रत्यक्षात महिलांचा सहभाग हा अतिशय नगण्य दिसून येतो. याला मुख्य कारण म्हणजे पितृसत्ताक मानसिकता होय.

**महिला प्रतिनिधीत्वाची आकडेवारी:**

महाराष्ट्राच्या २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १०० पुरूषांमागे ९२९ महिला मतदार आहेत तर २०१९ मध्ये हा रेशो ९२५ पर्यंत घसरला तसेच २०२४ मध्ये १००० पुरूष मतदारांमागे ९३६ महिला मतदार आहे. सध्याच्या घडीला महाराष्ट्रात ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला मतदार आहे. एवढे असून सुध्दा २०२४ च्या विधानसभेत मात्र २८८ पैकी २१ महिला म्हणजे १३ टक्के महिला प्रतिनिधी निवडूण आल्या आहेत. जर महिलांचा सहभाग जर ५० टक्के पर्यंत पोहचला तर महिला ह्या पुरूषांच्या समानतेचा पुरस्कार करतील. हा खरा न्याय इरेल. १०६ घटना दुरूस्ती यामुळेच केली आहे. कही राज्यातील अवघे १ ते २ टक्के प्रतिनिधी दिसून आल्या आहेत. ३३ टक्के आरक्षण मिळाल्यामुळे २०१९ पासून प्रत्येक विधानसभेत ३३ टक्के प्रतिनिधी महिला पाहवयास मिळतील.

**समारोप:**

**महाराष्ट्र विधानसभेत महिलांचे प्रतिनिधित्व कमी आहे. यासाठी** पक्षीय भुमीकेत बदल करणे आवश्यक आहे. त्यांना मंत्रिमंडळात महत्त्वाची खाती देण्यात यावी. महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात यावे. स्थानिक ते संसदेपर्यंत महिलांचा सहभाग वाढून त्यांना समानता द्यावी.

**संदर्भ सूची:**

१. रंजन कोळंबे- भारतीय राज्यघटना व प्रशानस
२. लोकसत्ता वर्तमान पत्र
३. महाराष्ट्र टाईम वर्तमान पत्र
४. एम लक्ष्मीकांत - भारतीय राज्यघटना
५. www.Ecipidiya संकेतस्थळ